# समर्थ रामदास स्वामी लिखित वाङ्‌मयाचे डिजिटलायझेशन पूर्ण

प्रतिनिधी | नाशिक

समर्थ रामदास स्वामींनी १६२० ते १६३३ मधील नाशिकच्या टाकळी येथील वास्तव्यात लिहिलेल्या सुमारे ३५०० पृष्ठांमधील ओवी, पदांचे या अभंग पदरूपी ठेवींचे धुळ्याच्या समर्थ वागदेवता मंदिरात समर्थ भक्त नानासाहेब देव यांनी १९०५ मध्ये स्वखर्चाने १ ते ५० भागांमधील सर्व लेखन साहित्याचे आधुनिक युगानुसार डिजिटलायझेशन पूर्ण केले आहे.

धुळे येथील समर्थ वागदेवता मंदिराचे अध्यक्ष शरद कुबेर व कार्याध्यक्ष डोंगरे यांनी समर्थ रामदास स्वामींच्या टाकळीच्या संदर्भातील साहित्याचा १७ सीडींचा संच टाकळी देवस्थानचे विद्यमान अध्यक्ष एन. के. ब्रह्मे (अतिरिक्त सत्र न्यायाधीश) यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

तब्बल ४३ वर्षांच्या न्यायालयीन लढ्यानंतर टाकळी येथे २० डिसेंबर २०१२ रोजी न्यायालयाच्या आदेशाने पहिले पंचवार्षिक विश्वस्त मंडळ स्थापन झाले. त्या अनुषंगाने हे काम मार्गी लागले. समर्थ भक्तांना हे सर्व साहित्य टाकळी मठात मोफत उपलब्ध होईल, तसेच त्यासाठी आवश्यक कॉम्प्युटर, लॅपटॉप, स्वतंत्र अभ्यासाची बैठक व्यवस्था करण्यात येईल, असे आवाहन ब्रह्मे यांनी केले. यावेळी जोतिराव खैरनार, सुधीर शिरवाडकर, प्रकाश पवार, शरद कुबेर उपस्थित होते.